# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## परिपत्रक क्र.१०५/२०२०

**विषय : परिपत्रक क्र. १२५ अंतर्गत येणा-या अंतिम सत्रातील/अंतिम वर्षातील सर्व अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांकरिता परीक्षांचे आयोजन करण्याबाबत मार्गदर्शक तत्वे व सूचना.**

कोव्हिड-१९ च्या प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर विद्यापीठाच्या विविध अधिकार मंडळांनी निश्चित केलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार परिपत्रक क्र. १२५ अंतर्गत येणा-या अंतिम सत्राच्या/अंतिम वर्षाच्या सर्व अभ्यासक्रमांमधील विद्यार्थ्यांच्या परीक्षांचे नियोजन करण्यात यावे. याबाबतची मार्गदर्शक तत्वे व सूचना खालीलप्रमाणे आहेत.

१. ज्या अभ्यासक्रमांचे प्रात्यक्षिक/मौखिक/प्रकल्प/चर्चासत्र(Seminar)परीक्षा निर्धारित पध्दतीने घेतल्या गेलेल्या नाहीत अथवा झालेल्या नाहीत, त्या सर्व परीक्षांचे आयोजन दिनांक १५ सप्टेंबर, २०२० ते दिनांक ३० सप्टेंबर, २०२० दरम्यान Online पध्दतीने उपलब्ध असलेल्या Google Meet, Microsoft Team, Zoom, WebEx, Telephone इत्यादी विविध पध्दतीने आयोजित करण्यात यावेत व सदर परीक्षा या अभ्यासक्रमाच्या आराखडयामधील संपूर्ण गुणांवर आधारीत असाव्यात व त्या संपूर्ण गुणांसाठी विद्यार्थ्यांना गुणदान करण्यात यावे. यामध्ये कोणत्याही स्वरुपाचे रुपांतर करण्यात येऊ नये. त्यासंबंधीचे संपूर्ण रेकॉर्डीग महाविद्यालयांमध्ये जतन करुन ठेवणे आवश्यक आहे.

२. अंतिम सत्रामधील/अंतिम वर्षामधील विद्यार्थ्यांच्या अनुशेषित विषयांच्या (Backlog Subjects) तसेच नियमित (Regular) विषयांच्या परीक्षांचे आयोजन दिनांक ०१ ऑक्टोबर, २०२० ते दिनांक ३० ऑक्टोबर, २०२० दरम्यान करण्यात यावे व निकालाची प्रक्रिया दिनांक १० नोव्हेंबर, २०२० पूर्वी पूर्ण करुन निकाल परीक्षा विभागात सादर करण्यात यावेत. या परीक्षा Online/offline बहुपर्यायी प्रश्नाव्दारे (MCQ), एक तासाची परीक्षा अशा पध्दतीने घेण्यात याव्यात. Online व Offline या दोन्ही पध्दतीने होणा-या बहुपर्यायी प्रश्न (MCQ) स्वरुपाच्या परीक्षा या ५० गुणांच्या ६० मिनिटे (एक तास) कालावधीच्या राहतील. यासाठी दिलेल्या ६० बहुपर्यायी प्रश्नांपैकी (MCQ)५० प्रश्नांची अचूक उत्तरे ग्राहय धरण्यात यावीत. या परीक्षेमध्ये ४० टक्के सोपे, ४० टक्के मध्यम व २० टक्के कठीण या काठिण्यपातळीचे प्रश्नांची रचना असावी.

३. सदर परीक्षांचे वेळापत्रक महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावे. तसेच सदर वेळापत्रक विद्यापीठाच्या मा.संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ कार्यालयाकडे दिनांक ५ ऑक्टोबर, २०२० पर्यंत सादर करण्यात यावेत

४. जे विद्यार्थी offline चा पर्याय निवडतील त्यांच्यासाठी OMR Sheet चा वापर करुन offline पध्दतीच्या परीक्षांचे आयोजन हे महाराष्ट्र शासन, विद्यापीठ अनुदान आयोग, आरोग्य मंत्रालय यांनी कोव्हिड-१९ बाबत दिलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार सुरक्षित अंतर ठेवून, विद्यार्थ्यांची सुरक्षा व परीक्षांचे पावित्र्य राखून महाविद्यालये/संस्थांमध्ये करण्यात यावे. यासाठीचे वेळापत्रक महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर जाहीर करण्यात यावे.

५. कोणत्याही कारणास्तव जे विद्यार्थी अंतिम सत्र/अंतिम वर्षाची नियमित (Regular) अथवा अनुशेषित (Backlog) विषयांची परीक्षा देवू शकणार नाहीत, त्यांची परीक्षा स्वतंत्रपणे घेण्यात यावी.

६. Online परीक्षेची संपूर्ण माहिती होण्यासाठी अंतिम परीक्षेमधील नमूना प्रश्नांवर आधारीत सराव परीक्षांचे आयोजन (Mock Test/Practice Test) मुख्य परीक्षेपूर्वी करण्यात यावे.

७. दिव्यांग विद्यार्थ्यांना शासन निर्णयाप्रमाणे सोयी व सवलती देय राहतील. तसेच या विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी २० मिनिटे अधिकचा वेळ देय राहील. सदर विद्यार्थ्यांना महाविद्यालये/संस्थाचे प्राचार्य/संचालक यांच्या पूर्वपरवानगीने लेखनिक/ सहायक घेता येईल.

८. अंतिम वर्ष/अंतिम सत्राच्या नियमित (Regular), पुन:परीक्षार्थी (Repeater) व अनुशेषित (Backlog) विद्यार्थ्यांच्या समसत्राच्या परीक्षा दिनांक १३ मार्च, २०२० पर्यंत पूर्ण झालेल्या अभ्यासक्रमावर घेण्यात याव्यात. अंतिम पूर्व वर्षाच्या/सत्राच्या पुन:परीक्षार्थी (Repeater) विद्यार्थ्यांच्या परीक्षा या संपूर्ण १०० टक्के अभ्यासक्रमावर घेण्यात याव्यात. या परीक्षा बहुपर्यायी प्रश्न (MCQ) स्वरुपात आयोजित करण्यात याव्यात.

९. Online व Offline या दोन्ही पध्दतीने होणा-या बहुपर्यायी प्रश्न (MCQ) परीक्षांसाठी छायांकित प्रत व पुनर्मूल्यांकनाची सुविधा उपलब्ध राहणार नाही.

१०. सदर परीक्षांच्या आयोजनापूर्वी येणा-या अडचणी व शंकांचे निराकरण करण्यासाठी महाविद्यालयामध्ये हेल्पडेस्क तयार करण्यात यावा. तसेच प्रत्यक्ष परीक्षेदरम्यान येणा-या अडचणींचे निवारण करण्याकरिता अभ्यासक्रमनिहाय समन्वयकांची नियुक्ती करण्यात यावी व त्याचा तपशील स्वतंत्रपणे महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर जाहीर करण्यात येईल.

मा.प्राचार्य/संचालक यांना विनंती करण्यात येते की, वरील मार्गदर्शक तत्वे व सूचनांचे अवलोकन करुन याबाबत आपल्या महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर सेवक व विद्यार्थी यांना आपल्या स्तरावरुन सूचित करावे.

(महेश काकडे)
संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

संदर्भ : परीक्षा-समन्वय/ ३७२
दिनांक : २३ सप्टेंबर, २०२०

प्रति,
१. मा. प्राचार्य/संचालक
परिपत्रक क्र. १२५ अंतर्गत येणारी सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था/स्वायत्त संस्था,
पुणे, अहमदनगर, नाशिक जिल्हा

प्रत माहितीसाठी :
१. मा.कुलगुरु यांचे कार्यालय
२. मा.प्र-कुलगुरु यांचे कार्यालय
३. मा.अधिष्ठाते, सर्व विद्याशाखा